।।ॐ।।

।। श्रीस्वामी स्वरूपानंद प्रसन्न ।।

# ❋ श्रीस्वरूपानंद जन्मोत्सव सोहळा ❋

***नका वाजवू कुणी पाऊले, हळुवाराचे राज्य येथले ।***
***नीरव शांति इथली भक्तां पूर्णगडा नेई ।।***



श्रीक्षेत्र पावस येथील अनंत निवासातील श्रीस्वामींच्या खोलीत पाऊल टाकताना श्रीस्वामीभक्तांच्या मनात आजही अगदी हीच भावना उदित होत असेल! कै. सविता पारिजात यांनी रचलेल्या श्रीस्वामींच्या पाळण्यातील शब्द म्हणजे मूर्तिमंत श्रीस्वामीच जणू! विश्ववत्सलता, पराशांति, हळुवारतेने नटलेली गुरूमाई स्वरूपाई हीच श्रीस्वामीमूर्ति. अन् चाळीस वर्षांच्या त्या पावन वास्तव्याने त्या खोलीच्या अणूरेणूंचे स्पंदनस्वरूपही तेच झाले आहे हे भाविकांस खोलीत प्रवेश करताक्षणी, नव्हे नव्हे त्या खोलीच्या केवळ स्मरणानेसुद्धा बैसल्या ठायीच अनुभवावयास मिळते!!

ज्ञान-भक्तीचे स्पंद विहरती, अमुच्या या पावसी, श्रीस्वामींच्या पावसी ।
या हो या हो सकल जन हो, या हो या हो भक्तजनहो, धुंद व्हावयासी ।।१।।
नित्य तत्पर स्वामी अमुचा, कृपा करायासी ।
विनीत साधका खूण देतसे, जाताचि पावसी ।।२।।
आत्मानात्म हंस-वृत्ति, अंगी बाणण्यासी ।
साह्य करितसे स्वामी-संपदा, सकल साधकांसी ।।३।।
सोऽहं अनुभूति बोध अर्पुनि, सिद्ध करायासी ।
अनंत निवासी अखंड तिष्ठत, स्वामी पलंगासी ।।४।।
कृष्णदास विनवितसे सकळां, करु नका विलंबासी ।
स्वामीदर्शनी त्वरे जाऊनि, करु धन्य जीवनासी ।।५।।

स्वार्थरहित लोकसेवाव्रत अंगिकारलेला व क्रांतिकारक असा तरुण ‘रामचंद्र विष्णुपंत गोडबोले’ आयुष्यातील विविध घटनाक्रमांना सामोरे जात असताना सहजपणे कसा अध्यात्ममार्गात वळला, त्यात अग्रेसर होऊन आत्मदर्शी ‘स्वरूपानंद’ झाला अन् त्यानंतरच्या अखंड सोऽहम् अनुसंधानाने ‘परमहंस’ पदावर पोहोचला ते श्रीस्वामींचे सुलभ चरित्रात अगदी पारदर्शीपणे पहावयास मिळते. ‘‘**प्राप्त कर्माचरणी निपुण । भक्तिज्ञाने सुसंपन्न । अखंड करी सोऽहम् ध्यान । कृतार्थ जीवन होय त्याचे**’’ व ‘‘**स्वरूपाचे ज्यासी निरंतर भान । त्यासी समाधान अखंडित**’’ हे श्रीस्वामींच्या चरित्राद्वारे साधकजनांस मिळणारे उपदेशसार आहे. तसेच ‘‘**असे भक्तिभाव जयांचे अंतरी । तेथे वास करी निरंतर**’’ ही श्रीस्वामींनी भाविकांस दिलेली ग्वाही आहे.

प्रत्येक जीवात अखंड चालत असलेला सोऽहम् इतका हळुवारपणे कार्यरत असतो की सामान्यपणे त्याची जाणीवसुद्धा होत नसते. श्रीसद्गुरूंच्या भेटीनंतर तो प्रत्ययास येऊ लागतो व त्याच्या अखंड अनुसंधानानेच तो जीव शिवपदी विराजमान होतो.

ही सोऽहम् साधना ही नाथपंथाची विश्वाला असलेली अमोलिक देण. आदिनाथाकडून मच्छिन्द्रनाथांद्वारे श्रीज्ञानेश्वर माऊलींपर्यंत आलेला हा राजयोग परंपरेने श्रीसद्गुरू श्रीगणेशनाथांद्वारे श्रीस्वामींस मिळाला. ते अखंड सोऽहम् अनुसंधान व त्यासोबतच स्थितप्रज्ञाची लक्षणे पूर्णत्वाने अंगी बाणण्यास बारा वर्षे

केलेले कठोर परिश्रम याद्वारे श्रीस्वामींनी त्याचा अनुभव घेतला व जीवनाचे सार्थक केले. आत्मसाक्षात्कारानंतर जवळपास चोवीस वर्षे म्हणजे दोन तपे अत्यंत गुप्तपणे वर्तत त्याच अखंड सोऽहम् भजनाने श्रीस्वामी सोऽहम्-स्वरूपच होऊन गेले. सोऽहम् सोऽहम् सोऽहम्.... 'तो मी' 'तो मी' 'तो मी'. सहज असलेली पण संपूर्ण मोहनिरास होइस्तोवर सतत करावयाची अशी ही सोऽहम् साधना. अखंड अभ्यास हवा, त्यात खंड पडला तर ईश्वराची करुणा भाकणे अन्यथा भक्तास सांभाळणारा, सावरणारा त्याविना दुसरा कोण आहे बरं! सहज समाधि साधण्याकरिता या 'सोऽहम्' खेरीज अन्य कुठलेही साधन लागत नाही हे श्रीस्वामींनी स्वानुभवाने दाखवून दिलं आहे. आणि एकदा कां ते 'सोऽहम्'-सार हस्तगत झालं की सर्व शास्त्रसंभारसुद्धा वृथाच असे श्रीस्वामी सांगतात.

अशा या सहज सुंदर सोऽहम् साधनेच्या परिपूर्णतेने श्रीस्वामी योगदुर्गाच्या शिखरावर आरुढ झाले. त्या योगबलाने श्रीस्वामींचा देह म्हणजे पंचतत्वांचा सामान्य देह उरलाच नव्हता मुळी. निखळ परब्रह्मच ते! मग दर्शनास येणाऱ्या भाविकांस ज्याचे त्याचे दैवत, ज्याचे त्याचे सद्गुरूस्वरूप, प्रकाशरूप, वा त्याचे मनातील भावाचे साकार स्वरूप श्रीस्वामींचे ठायी दिसे त्यात नवल ते काय! परंतु



श्रीस्वामीकृपेने त्यांच्या सानिध्यात लाभत असलेला सर्वात मोठा अनुभव म्हणजे दर्शनार्थींच्या मनातील विविध विचारांचे, प्रश्नांचे, वासनांचे काहूर एका क्षणात नाहीसे होऊन त्याला अल्पकाळ का असेना पण तात्काळ लाभणारी स्वरूपानुभूति, वा तो पराशांतीचा अनुभव. तीच असे खरी स्वरूपानंद भेटी, तेच असे स्वरूपानंद दर्शन!

संतांच्या चमत्कारांकडे सहजीच लक्ष जात ।
परि त्यांची 'अतिमानवता' ना येतसे सहजी ध्यानात ।।१।।
साधेपणा विनय विनम्रता करुणा प्रेम गुरुभक्ति ।
ब्रह्मपद तदाकारता सर्वकाळ, सदा निरहंकार वृत्ति ।।२।।
प्रसन्नता काय वर्णावी निरंतर, अन् समता व्यापिली जी चित्ती ।
तळमळ जन कल्याणाची अखंड, परि अनाग्रही वृत्ति ।।३।।
ऋद्धि सिद्धि फिकी ज्यापुढे ऐसी ही दैवी गुणसंपत्ति ।
एकेक गुण आंगवाया जन्मोजन्म जाती! ।।४।।
गुरुभक्ति - साधनेचा संत निरंतर उपदेश करिती ।
ज्यामुळे लाधलीसे त्यांसी, ही दैवी गुण संपत्ति ।।५।।
संतांच्या वसतिस्थानी, स्पंदने त्यांची, अजूनही फिरती ।
पावसी जाता कृष्णदास 'नित्यचि' अनुभवति! ।।६।।

इतका काळ गुप्त राहिलेल्या श्रीस्वामींनी आता जनोद्धाराचे कार्य करावे असा ईश्वरी संकेत असावा. त्यानुसार १९६९ साली प्रसिद्ध झालेल्या श्रीदीपलक्ष्मी श्रीस्वामी स्वरूपानंद दीपावली विशेषांकाद्वारे श्रीस्वामींची सर्वदूर प्रसिद्धि झाली व असंख्य भक्तभाविक श्रीस्वामींच्या दर्शनास येऊ लागले. त्यातील इच्छुकांस श्रीस्वामी सांप्रदायिक मार्गदर्शन करु लागले.

अनुग्रहकाली श्रीस्वामी शिष्यास ती सोऽहम् प्रक्रिया करुन दाखवीत व तसा अभ्यास करण्यास सांगत. आग्रह नसे बरं कां अजिबात. कारण श्रीस्वामींचा मूळ




पिंडच अनाग्रही होता. पण ज्यास ते खरोखरच हवे आहे, ते साधावयाचे आहे, ते त्याच्या आयुष्याचे ध्येय ठरले आहे तो हा अभ्यास करणारच करणार. त्यासाठी आग्रह कशास! अन् एकदा का तो अवीट आनंद मिळू लागला की साधकास त्या स्वरूपाचा छंदच जणू जडतो. पण तो अनुभव येण्यासाठी प्रारंभी अंतरी संतत सोऽहं ध्यान करणे नितांत आवश्यकच. त्यामुळे लाभेल निजानुभव व अनुभवाकारणे वाढेल साधनेवरील

श्रद्धा व प्रज्ञास्थैर्य. त्याची परिणति म्हणजे उत्तरोत्तर वृद्धि पावणारा स्वरूपानुभव, शांति, समाधान. श्रीस्वामींनी साधनेसंदर्भात काही शिष्यांना सांगितलं ते प्रत्येक अनुग्रहिताने लक्षात घेण्यासारखे व त्यानुसार अभ्यास करणे आवश्यक आहे. श्रीस्वामी सांगतात,

**''श्रीबाबा महाराज वैद्यांनी मला जे व जसे दिले ते व तसे तुम्हांस दिले.**

**माझ्या सद्‌गुरूंनी जे अनुभविले व मला सांगितले तेच मी तुम्हाला दिले. स्वतः अनुभव घ्यावा. अनुभवी लोक पाठीशी असले की चुकावयाला होत नाही व निर्णय कायम राहून अचूक ठिकाणी जाता येते. साधकाने सांगितलेल्या मार्गाने जाण्याचा प्रयत्न मात्र थोडा-फार तरी केला पाहिजे. मी तसा केला, तुम्हीही तसाच करा.**

**आमचे गुरू बाबा महाराज वैद्य म्हणत की, सोहम् ध्वनि श्रवण होईल इतपत निदान तीनदा दीर्घ श्वसन करून मग त्याचीच धारणा दृढवीत, तो मी, तो मी, सः अहम् असा भाव मूर्ध्नि-आकाशात, मस्तकाकाशात शांतपणे दृढ करून एक क्षण निर्विकल्प, पुन्हा एक क्षण निर्विकल्प अशी अवस्था अनुभवीत स्वस्वरूप अद्वयानंद सिद्धि अनुभवावी. सर्व प्रकारच्या परिस्थितीत साधकाने मन शांत ठेवून गुरूने सांगितल्याप्रमाणे साधना करीत राहिले पाहिजे. गुप्तधन दाखविण्याचे कार्य गुरू करतो पण ते प्रयत्नाने साध्य करण्याचे कार्य साधकाचेच.**

**आपला संप्रदाय हा गुरोपदिष्ट मार्गे ज्याचा त्याने वाटचाल करून अनुभवावयाचा आहे. सोहम् अनुसंधानात्मक - सदोदित वृत्ति धारणा ही ज्या त्या साधकाचीच व्यक्तिगत अभ्यास करण्याची गोष्ट आहे. मला जसे गुरूने सोहम् धारणा तत्त्व सांगितले तसेच मी तुम्हांस सांगितले आहे. श्वासावर - अनाहत ध्वनिवर म्हणा क्षणाक्षणाने 'मी तोच आहे' ही धारणा करावयाची. वाटचाल फार मोठी पण हळूहळू मार्ग क्रमून ती साध्य होते. फक्त श्रद्धा व प्रयत्न पाहिजेत.**

**भजनाच्या (सोहम् ध्यानाच्या) वेळी काही अडथळे, विक्षेप आले तरी त्याचीच भावना दृढ केली की सर्व प्रकारचे चांचल्य-विक्षेप दूर होतात असे अनुभवाने सांगतो.**

**मुख्य सोहम् धारणा अखंड असणे. प्रत्येक श्वास-उच्छवासात मुक्ततेची आनंदनिष्ठा दृढतर होत जाऊन सहजावस्था प्राप्त होते हे लक्षात ठेवावे.**

**सद्गुरु चरणी दृढ विश्वास ठेवून केलेला अभ्यास जीवास तारक होतो.**

**सतत सोहम् अनुसंधानानेच सर्व साधेल हे पक्के लक्षात ठेवा.**

**मी काय म्हणतो आहे त्यावर तू विश्वास ठेव. तसे साधन कर, तदनुषंगिक साधना कर. तशी अनुभूति जर तुला आली नाही तर माझ्यावर तू खुशाल रागाव. मला दोष दे.''**



हा निरंतर अभ्यासाचा प्रयत्न म्हणजेच साधकाने करावयाचा पुरुषार्थ. आत्मोद्धारासाठी स्वत:च कष्ट घेतले पाहिजेत. प्रसन्नमनाने सहजासनावर बसून अर्धोन्मीलित नेत्र ठेवून अन्तरीं स्वस्थपणे दिन-रात्र करावयाचे हे साधन आहे. अनंताचा अनंत असा प्रांत आहे हा व त्या आनंदाची गोडी अवीट असल्याने त्याला कालाची सीमा नाही.

अंती प्राप्त होणार ते त्यांच्या कृपेनेच पण ती कृपा या पुरुषार्थाशिवाय कदापि लाभणार नाही. श्रीस्वामींनी त्यांच्या तरुणपणातील व्यस्त कार्यकालात व नंतरच्या आजारपणातील अंथरुणावरील खिळलेल्या अवस्थेतही कसोशीनं राखलेलं सोऽहम् अनुसंधान या पुरुषार्थाची साक्ष आहे. त्या पुरुषार्थानंतर उदित होणारी शरणागति असते त्या ज्ञानाची मंगल पहाटवेला. ती पहाट श्रीस्वामींच्या जीवनात उगवली. काशीनिवासी महान तपस्वी योगी परमहंस श्रीविशुद्धानंद देव व त्यांचे शिष्य महामहोपाध्याय पंडित श्रीगोपिनाथ कविराज यांच्या मुखातील उद्गार हेच सूचित करतात,

‘‘तीव्र पुरुषकार द्वारा प्राक्तन कर्म खंडन किया जा सकता है. पुरुषकार का महत्व असीम है. योगाभ्यास ही है मुख्य पुरुषकार. सद्गुरू के बताये पथ पर चलते हुये उनकी दी हुयी शक्ति के सम्पन्न बन करके निरन्तर श्रद्धा और संयम समवेत योग कर्म का अनुष्ठान करने से चित्तशुद्धि होती है और ज्ञान का उदय होता है. ज्ञान के दृढ होने पर शुद्ध भक्ति का संचार होता है. प्रेम की इस अवस्था में हृदय पिघल जाता है. जगदम्बा को पाने के लिये यह प्रेम ही एकमात्र साधन है.’’
-- परमहंस बाबा विशुद्धानंद देव

‘‘साधारणत: देखा जाता है कि श्वास-प्रश्वास की गति के प्रति हम लोगों का लक्ष्य नहीं रहता, किन्तु जब लक्ष्य रखने का अभ्यास किया जाय तब प्राण के साथ मन का योग होता है. यह योग प्राय: टूट जाता है. अभ्यास की दृढता होने से इस प्रकार एक अवस्था आती है, जब यह योग नही टूटता. तभी ठीक साक्षी अवस्था का एक आभास प्राप्त होता है. इसी आभास के साथ अन्तराकाश में प्रकाश खुलने लगता है. साथ ही साथ प्राण और अपान समान होकर श्वास और प्रश्वास धीमा होकर बन्द हो जाता है. नेत्र बन्द करने पर जो अन्धकार समझ में आता है - तब वह प्रकाशमय हो जाता है.’’ -- महामहोपाध्याय पं. गोपिनाथ कविराज

‘‘गुरु की कृपा और शिष्य का आत्मपौरुष सम्मिलित होकर असम्भव को सम्भव कर सकते है.’’ -- महामहोपाध्याय पं. गोपिनाथ कविराज

‘‘निजानुभव बिना आन्तरिक स्थिरता प्राप्त नही होती.’’ -- महामहोपाध्याय पं. गोपिनाथ कविराज

‘‘साधक का मुख्य उद्देश है भगवान या गुरू की प्रीति या प्रसन्नता का लाभ करना. अपने प्रयत्न से कामनासिद्धि नही होती इससे साधक का कर्तृत्वाभिमान नष्ट होता है. यह अभिमान जितना क्षीण होगा और भगवत्-कर्तृत्व अनुभव में आने लगेगा उतनी ही साधना की लभ्य वस्तु निकट होने लगेगी.’’ -- परमहंस बाबा विशुद्धानंद देव

‘‘ईश्वर-कृपा के बिना उसे कोई नहीं जान पाता है और न समझ पाता है और न ही पा सकता है.’’ -- परमहंस बाबा विशुद्धानंद देव

श्रीक्षेत्र पावसला दर्शनास आलेल्या प्रत्येक भक्तभाविकांस विश्ववत्सल श्रीस्वामी आपला शुभंकर उभावून अखंड आशीर्वाद देतच असतात. त्याचसाठी तर ते श्रीक्षेत्र पावस येथे संजीवन समाधिस्थ झालेले आहेत. चला तर आज या श्रीस्वामी जयंतीदिनी पाऊलांचा आवाज न करता, अगदी हळुवारपणे, श्रीस्वामींच्या पावस दरबारात प्रवेश करुया व त्या शांतीस्वरूपाशी तादात्म्य पावावयाचा प्रयत्न करुया अन् श्रीस्वामींच्याच कृपेने श्रीस्वामीदर्शनाचा, त्या स्वरूपाचा, त्या स्वरूपानंदाचा, त्या पराशांतीचा अनुभव घेऊन जीवन धन्य करुया!! स्व-स्वरूपानंदाची ती लाभलेली गोडी पुढे सततच्या अभ्यासाने जेव्हा दृढ होऊन श्रीस्वामींप्रमाणे **'मी-तूंपण अस्तवलें आलें साधनेस पूर्णत्व । कणकणांत कोंदलें एकलें एक नित्य सत्तत्त्व'** असा चिरस्थायी अनुभव जेव्हा येईल तेव्हा जीवास स्वरूपानंदाचा कायमस्वरूपी लाभ होईल व तेव्हाच खऱ्या अर्थाने जीवाचा स्वरूपानंद जन्मोत्सव साजरा होईल, व तो भक्तांसच नव्हे तर सद्गुरू श्रीस्वामींसही कृतार्थता व परमानंद देणारा असा एक सोहळा होईल!! **चला तर आज या पावन दिनी श्रीस्वामींरायांस वंदन करुन करुया अभ्यासास आरंभ . . .**

स्वामीसंगे सोऽहम् रंगे रंगुनिया जाऊ ।
स्वरूपानंदी रंगुनिया स्वरूपानंद गाऊ ।।१।।
'मी'पणाचा ठाव नि:शेष हा जाळू ।
स्वामी नाम ज्योत सर्वांगी ती उजळू ।।२।।
स्वामी बोध प्रकाशात वाट सारे चालू ।
स्वामी पुढे वाटाड्या, मागे हळू हळू चालू ।।३।।
ऋद्धि सिद्धि प्रसिद्धीचे फाटे, त्यासी ना ते भूलू ।
ध्येय लक्ष्य अचूक, त्याची वाट ना ती सोडू ।।४।।
कृपासागरू स्वामी माझा, त्यासी ना ते विसरू ।
कृष्णदासा अढळ विश्वास, स्वामी पावविती, सुखे पैलपारू ।।५।।

।। ॐ शांति शांति शांति ।।

**-*- सुदेश चोगले -*-**

(मार्गषीर्श वद्य द्वादशी शके १९४१ - दि. २३.१२.२०१९)

## ।। श्रीस्वामींच्या सोऽहम् ध्यानमग्न मुद्रा ।।







## ।। श्रीस्वामींचा पाळणा ।।

सोऽहम् दोरी जोजविते मी गाते अंगाई, मी गाते अंगाई ।
नीज लाडके विश्ववत्सले माझ्या स्वरूपाई, मी गाते अंगाई ।।धृ.।।

पराशांतीची तुझी साधना ।
कसा हालवू सांग पाळणा? ।।
भक्तांसाठी उन्मनीतुनी तू क्षणभर खाली येई ।।१।।

प्रवास अमुचा युगायुगाचा ।
तुझ्यामुळे सुखदायी व्हायचा ।।
शुभंकराते उंचावून तू आशीर्वच देई ।।२।।

नका वाजवू कुणी पाऊले ।
हळुवाराचे राज्य येथले ।।
नीरव शांति इथली भक्ता पूर्णगडा नेई ।।३।।

सतत ठेविल्या अनुसंधानी ।
तुझे रूप निज अन्तःकरणी ।।
मनात अससी जनात दिससी तू अंतर्बाह्यी ।।४।।

असे कसे ग जगावेगळे ।
आईला जोजविती बाळे ।।
आई घेते विश्रांती अन् बाळा शांति देई! ।।५।।

**--रचयिता कै. सविता पारिजात, कोल्हापूर**

* * * * *